01 SEP 2022 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापुरातील अस्मिता मारुलकर यांच्या स्मरणार्थ उभारावयाच्या संशोधक विद्यार्थिनी वसतिगृहाचे कोनशिला अनावरण देणगीदार रजनी आणि पंडित मारुलकर यांच्या हस्ते मंगळवारी करण्यात आले. यावेळी शेजारी कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील, आदी उपस्थित होते.

# मारूलकर दाम्पत्याच्या मदतीने १५ दिवसांत वसतिगृहाची उभारणी सुरू

## शिवाजी विद्यापीठाची कार्यवाही : काम गतीने पूर्ण होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** मारूलकर दाम्पत्याने आपल्या मुलीच्या भवितव्यासाठी कष्टाचा पै न् पै साठवून जमा केलेली ३५ लाख रुपयांची बचत तिच्या अकाली निधनानंतर शिवाजी विद्यापीठाकडे सुपुर्द केली. या दातृत्वाचा सन्मान करीत अवघ्या १५ दिवसांत विद्यापीठाने या दाम्पत्याच्याच हस्ते अस्मिता मारूलकर यांच्या स्मरणार्थ उभारावयाच्या हीरकमहोत्सवी संशोधक विद्यार्थिनींसाठीच्या वसतिगृहाचे भूमिपूजन मंगळवारी केले.

पंडित आणि रजनी मारूलकर दाम्पत्याने विद्यापीठाकडे दि .१५ ऑगस्टला निधी सुपूर्द केला. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी या निधीमधून संशोधक विद्यार्थिनींसाठी वसतिगृह उभे करील आणि त्याच्या कोनशिलेवर अस्मिता यांच्या स्मरणार्थ असा उल्लेख केला जाईल, याची ग्वाही दिली. त्यानंतर १५ दिवसांत 'कमवा व शिका' विद्यार्थिनी वसतिगृहाशेजारीच या संशोधक विद्यार्थिनी वसतिगृहाचे भूमिपूजन करण्यात आले.

> या निधीबद्दल मारुलकर दाम्पत्याचे पुनश्च एकदा आभार मानतो. त्याचप्रमाणे, या वसतिगृहाचे काम गतीने सुरु होण्यासाठी व्यवस्थापन परिषदेचा सकारात्मक दृष्टिकोन कारणीभूत आहे. हे काम लवकर पूर्ण करण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न राहील.
>
> - डॉ. दिगंबर शिर्के, कुलगुरु

मारूलकर दाम्पत्यांनी खास या प्रसंगासाठी भूमीला अर्पण करण्यासाठी स्वतःच्या बागेतील फुले आणली होती. यावेळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले आदी उपस्थित होते.

01 SEP 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधक विद्यार्थिनी वसतिगृहाचे भूमिपूजन

## अवघ्या १५ दिवसांत शिवाजी विद्यापीठाचा पुढाकार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आपल्या विकलांग मुलीच्या भवितव्यासाठी कष्टाची पै अन् पै साठवून ३५ लाख रुपयांची बचत तिच्या अकाली निधनानंतर शिवाजी विद्यापीठाकडे सुपूर्द करणाऱ्या मारुलकर दांपत्याच्या दातृत्वाचा सन्मान करीत अवघ्या १५ दिवसांत शिवाजी विद्यापीठाने या दांपत्याच्याच हस्ते अस्मिता मारुलकर यांच्या स्मरणार्थ उभारावयाच्या शिवाजी विद्यापीठ हीरकमहोत्सवी संशोधक विद्यार्थिनींसाठीच्या वसतिगृहाचे भूमिपूजन करण्यात आले. विशेष म्हणजे पंडित मारुलकर आणि रजनी मारुलकर या दांपत्याच्याच हस्ते हे भूमिपूजन करून या इमारतीच्या बांधकामास प्रारंभ करण्यात आला.

विद्यापीठातील 'कमवा व शिका' विद्यार्थिनी वसतिगृहाशेजारीच या संशोधक विद्यार्थिनी वसतिगृहाचे भूमिपूजन करण्यात आले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी भूमिपूजन केले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, अजित चौगुले यांच्यासह व्यवस्थापन परिषदेच्या सर्व सदस्यांनीही भूमिपूजन कार्यक्रमात सहभाग घेतला. वसतिगृहाचे काम गतीने सुरू होण्यासाठी व्यवस्थापन परिषदेचा



**कोल्हापूर : अस्मिता मारुलकर यांच्या स्मरणार्थ उभारावयाच्या संशोधक विद्यार्थिनी वसतिगृहाच्या भूमिपूजनप्रसंगी रजनी व पंडित मारुलकर यांच्यासमवेत कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आदी.**

सकारात्मक दृष्टिकोन कारणीभूत असल्याचे सांगितले. हे काम पूर्ण करण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न राहील, याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

Times of India

# Cyber cell to probe fake SUK exam cancel letter

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The cyber cell of Kolhapur police will investigate the case involving circulation of a fake letter from Shivaji University, Kolhapur (SUK), informing the students about cancellation of an exam.

An official from the SUK said they have registered a complaint with the Kolhapur police regarding the case. "A fake letter with SUK's logo and letterhead was prepared by someone with a malicious intention. The letter stated that due to imminent reasons, the exam of one of the graduation subjects have been cancelled. The letter was widely circulated on the social media. This confused the students and teachers and some even missed appearing for the exam," the official said.

Superintendent of police Shailesh Balkawade said, "The university has a long-held reputation of conducting exams accurately without any glitches. Such instances are challenging for all the stakeholders involved. We have initiated an enquiry and will get to the root of the problem."

SUK's director of exam department Ajiitsinha Jadhav said, "We appeal everyone not to believe any fake letter received on social media without cross-checking with the university and the respective colleges. If anyone finds any suspicious letter then they should bring it to our notice to avoid confusion."